.. Shri Rama Arati ..

॥ श्री राम आरती ॥

त्रिभुवनमंडितमाळ शोभतसे गळां ।
आरती ओवाळूं पाहूं ब्रह्मपुतळा ॥ १ ॥

श्री राम जय राम जय जय राम ।
आरती ओवाळूं पाहूं सुंदर मेघश्याम ॥ धृ ॥

ठकाराचे ठाण करी धनुष्यबाण ।
मारुती सन्मुख उभा कर जोडून ॥ श्रीराम ॥ २ ॥

भरत शत्रुघ्न दोघे चवऱ्या ढाळिती ।
स्वर्गीहूनी देव पुष्पवृष्टि करिती ॥ श्रीराम ॥ ३ ॥

रत्नखचित माणिक वर्णू काय मुगुटी ।
आरती ओवाळूं चवदाभुवनांचे पोटी ॥ श्रीराम ॥ ४ ॥

विष्णुदास नामा म्हणे मागतो तूं ते ।
आरती ओंवाळू पाहू सीतापतीतें ॥ श्रीराम ॥ ५ ॥

इति

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 23, 1999